“शेती विकासात राष्ट्रीय पीक विमा योजनेचे योगदान

– विशेष संदर्भ लातूर जिल्हा

(2010-11 ते 2020-21)”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)

पदवीसाठी सादर केला जाणाऱ्या शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

-: संशोधक :-

सोमवंशी सुवर्णा भगवानराव

एम.ए. (अर्थशास्त्र), बी.एड्.

-: मार्गदर्शक :-

प्रा.डॉ.राजेश्री आप्पाराव जाधव

एम.ए., एम.फिल. पीएच.डी.,

अर्थशास्त्र विभागप्रमुख

महात्मा गांधी महाविद्यालय,अहमदपूर जि.लातूर

-: संशोधन केंद्र :-

शिवाजी महाविद्यालय, उदगीर

ता.उदगीर जि.लातूर

2022

“शेती विकासात राष्ट्रीय पीक विमा योजनेचे योगदान

– विशेष संदर्भ लातूर जिल्हा

(2010-11 ते 2020-21)”

➢ प्रस्तावना :-

भारत देश हा कृषीप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे वर्णन ‘कृषीप्रधान अर्थव्यवस्था’ असे केले जाते. तसे पाहिले तर प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला खुपच महत्त्व आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 60 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही कालखंडात अर्थव्यवस्था कृषीप्रधान राहिली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व विचारात घेता ते उपजिवीकेचे प्रमुख साधन म्हणून शेतीकडे पाहिले जाते.

महात्मा गांधींनी ‘भारतीय शेती ही भारतीय लोकांच्या उपजिविकेचे प्रमुख साधन असल्यामुळे शेती हा भारताचा आत्मा आहे असे म्हटले आहे.’ देशातील लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा देखील कृषी क्षेत्रातूनच केला जातो.

स्वातंत्र्योत्तर काळातही सुरवातीच्या काही वर्षात भारतीय शेती मागासलेली व गुणात्मकदृष्ट्या पारंपारिक स्वरुपाची होती. नियोजन काळात सरकारने शेतीच्या विकासाचे अनेक कार्यक्रम राबविले. जसे की, जमीन सुधारणा कार्यक्रम, पतपुरवठा, वाहतुक व दळणवळण इ. 1967-68 मध्ये हरितक्रांती (Green Revolution) घडून आली. यामुळे देश अन्नधान्याच्या उत्पादनाबाबत स्वयंपूर्ण झाला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आर्थिक विकासात शेतीचे महत्त्व प्रतिपादन करताना म्हणतात की, ‘शेती हे केवळ पोट भरण्याचे साधन नाही तर ते राष्ट्रीय उत्पन्नाचे एक मोठे साधन आहे.’

कृषी क्षेत्राची प्रगती ही आर्थिक विकासाची पहिली पायरी मानली जाते. कृषी क्षेत्रावर विशेषभर दिल्यावरच विकासाचा पुढचा टप्पा गाठला जाऊ शकतो. भारताने आर्थिक विकासासाठी नियोजनाचा मार्ग स्विकारला. त्यानुसार पंचवार्षिक योजनेत कोट्यावधी रुपये खर्च केले तरीही भारतीय शेती समोर अनेक आव्हाने आहेत.

भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. मान्सून हा लहरी आहे. बारमाही शेतीला पाणीपुरवठा होईल अशी सुविधा भारतात नाही. भारतात आजही सिंचन सुविधेचा अभाव आहे म्हणुन शेती क्षेत्र कोरडवाहू आहे.

अलीकडच्या कालखंडामध्ये हवामानात मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. उत्पादन अस्थिर आहे त्यामुळे उत्पादनाचा अंदाज बांधता येत नाही. वातावरणात बदल झाल्यामुळे कधी अधिक पाऊस तर कधी कमी पाऊस किंवा पाऊस पडत नाही. त्याचा विपरित परिणाम कृषी क्षेत्रावर होतो. तसेच हवामान बदलामुळे अनेक प्रकारची रोगराई पिकांवर निर्माण होते. तसेच शेतकऱ्यासमोर भांडवल, शेतीमाल विपणन, वाहतूक, मध्यस्थ गोदाम व साठवणूकीचा अभाव, किंमतीतील चढ-उतार इत्यादी समस्या आहेत.

वरील सर्व आव्हानांमुळे भारतातील व पर्यायाने महाराष्ट्रातील शेतकरी आर्थिक व मानसिक दृष्ट्या खचला आहे. यातून त्याला बाहेर काढण्यासाठी शासन विविध प्रकारच्या योजना राबविते त्यापैकी एक म्हणजे राष्ट्रीय कृषी विमा योजना होय.

मोरीएन वेबस्टर डिक्शनरी नुसार :

“पूर, दुष्काळ, कीड अशा नैसर्गिक आपत्ती विरोधात शेतकऱ्यांना दीली जाणारी भरपाई, सुरक्षितता किंवा नुकसान भरपाईची हमी म्हणजे पीक विमा होय.”

देशात व महाराष्ट्रात सिंचन क्षेत्राचे प्रमाण अनुक्रमे 40 टक्के व 18 टक्के असल्यामुळे महाराष्ट्रात 82 टक्के शेती निसर्गावर अवलंबुन आहे. त्याचा परिणाम भारत व महाराष्ट्रातील शेतीच्या उत्पादनात झाला आहे. त्यामुळे प्रचंड नुकसान होऊन त्यांचा कर्जबाजारीपणा वाढत आहे. अशा परिस्थितीत आधार देण्यासाठी पीक विम्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यानी आपल्या जवळील सर्व पैसा शेतीत लावल्यानंतर नैसर्गिक

आपत्तीमुळे जर त्यांचे संपूर्ण आर्थिक नुकसान झाले तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची पातळी खालावते. पीक विमा योजनेमुळे त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य येऊन त्यांच्या जीवनमानाची पातळी देखील स्थिर राहते.

शेती व शेतकऱ्याची वित्तीय अडचण दूर करण्यासाठी त्रिस्तरीय सहकारी बँकाची निर्मिती करण्याबरोबरच प्रादेशिक ग्रामीण बँकेची स्थापना करण्यात आली.

व्यापारी बँकेचे राष्ट्रीयकरण संख्यात्मक विमा पुरवण्यात भरपूर वाढ करण्यात आली. 12 जुलै 1982 रोजी नाबार्ड (NABARD) तर कृषी क्षेत्रातील शिखर बँकेची स्थापना करुन कृषीसाठी मोठ्या प्रमाणात विमा पुरवठा व कृषी क्षेत्रात गुंतवणूक झाली. यामुळे कृषी क्षेत्राचा विकास साधण्यास मदत झाली.

महाराष्ट्रात 50 वर्षापूर्वी शेती व्यवसाय पारंपारिक पध्दतीने केला जात होता. परंतू सन 1965 नंतर यामध्ये बदल होत गेला. विविध संकरित वाणाची निर्मिती व त्याचा वापर जपानी पध्दतीनी भात लागवड पध्दतीचा वापर, आधुनिक रासायनिक खताचा, बि-बियाणे, किटकनाशकांचा वापर, यांत्रिकीकरणाचा वापर, ठिबक व तुषार सिंचन या पाणी देण्याच्या सुधारित पध्दतीने उत्पादनात वाढ तर झालीच परंतु वेळ व पाण्याची बचत झाली.

एकेकाळी शेतीमध्ये देशात खालच्या क्रमांकावर असलेले हे राज्य वसंतराव नाईक साहेबांच्या कृषी धोरणामुळे देशातील आघाडीचे राज्य बनले म्हणूनच वसंतराव नाईक यांना महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचे जनक म्हणतात.

अशा प्रकारे शेती व्यवसायात पीक वीमा ही महत्त्वाची भूमिका बजावते. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याच्या शेतकऱ्याप्रमाणेच लातूर जिल्ह्यातील शेतकरी सुध्दा पीक विमा काढण्यात अग्रेसर आहेत. पीक विम्याचे महत्त्व जाणून आहेत. पीक विमा लातूर जिल्ह्यातील शेती मध्ये कसा वरदान ठरला आहे. याचा आढावा प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे.

➢ संशोधन विषयाचे महत्त्व :

भारतातील शेती ही पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. प्राकृतिक आपदा म्हणजेच दुष्काळ पूर चक्रीवादळ, गारपीठ वादळ आणि भूकंप यामुळे शेती व्यवसायावर प्रचंड ताण

येतो. मानव निर्मित आपदा सुद्धा ज्यामध्ये आग,कीटकनाशक खते, तेजी मंदी इत्यादी हे सर्व शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादन व उत्पन्न कमी होण्यास कारणीभूत ठरतात आणि एकूणच यामुळे शेतकऱ्यांवर मर्यादा पडतात. उत्पन्नातील अनिश्चिततेमुळे शेतकरी शेती मध्ये नवीन सुधारणा करू शकत नाहीत. या सर्व कारणामुळे शेतकरी सावकारी पाशा मध्ये अडकतो.

भारतीय शेतकऱ्याविषयी असे म्हणतात की, 'शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो, कर्जात मरतो'. या सर्व बाबींवर शेतकऱ्याला आर्थिक मदत करण्याच्या हेतूने 'राष्ट्रीय पीक विमा योजना' महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

शेती मधील वाढते व्यापारीकरण, तसेच शेतीच्या कमी आकारमानामुळे प्रतिकूल परिस्थितीत वाढ होते. या धोक्यापासून शेतीचे तसेच शेतकऱ्यांचे कसे संरक्षण केले पाहिजे हा प्रश्न सर्वात महत्त्वाचा आहे. पिकांना आधारभूत किंमत देणे तसेच उत्पन्नात विविधता निर्माण करणे यातून बऱ्याच पिकांच्या बाबतीत आणि बहुतेक राज्यात विमा लागू केला नाही.

आधुनिक काळात करारशेती आणि भावी व्यापार अस्तित्वात आले यामध्ये काही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अंदाज किमतीवर विमा दिला जातो. परंतु कृषी विमा एक महत्त्वपूर्ण कार्य करते जे शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादन आणि उत्पन्न यांच्यातील नैसर्गिक आणि मानवनिर्मित जोखीमेतील अनिश्चितता दूर करत आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या सहयोगाने १९८९ साली 'पायलट पिक विमा योजना' स्वर्गीय राजीव गांधी पंतप्रधान असताना सन १९८५ मध्ये केंद्र शासनाने देशात ही योजना सुरु केली. १९९७-९८ साली 'प्रायोगिक पीक विमा योजना' राबविण्यात आल्या. वरील सर्व योजना विशिष्ट पिके आणि विशिष्ट प्रदेशा पर्यंतच मर्यादित होत्या. ही कमतरता दूर करून राष्ट्रीय पातळीवर देशातील सर्व शेतकऱ्यांना कृषी उत्पादनातील जोखीमेपासून सुरक्षा देण्यासाठी १९९९-२००४ च्या खरीप हंगामापासून सर्वसमावेशक अशी 'राष्ट्रीय पिक विमा योजना १९९९-२०००' प्रारंभ केली आहे.

२३ जून १९९९ मध्ये मा.पंतप्रधानांनी राष्ट्रीय कृषी विमा योजना (RBY) ही राष्ट्रीय कृषी योजना (NATS)अंतर्गत सुरू केली. राष्ट्रीय कृषी विमा योजना ही २५ राज्ये व २ केंद्रशासित प्रदेशात राबविण्यात येत आहे. १९९९-२००० ते २०११-२०१२ मध्ये ३०१४३५ शेतकऱ्यांच्या २६,४३५ (हजार हेक्टर) शेतीवर विमा उतरविण्यात आला होता.

शेती व्यवसायावर नैसर्गिक बदलाचा मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. अनिश्चिततेमुळे शेतीच्या उत्पादनामध्ये अनिश्चितता येते. भारतीय शेती मान्सूनचा जुगार आहे महापूर, दुष्काळ, अतिवृष्टी, वादळ, रोगराई इत्यादी घटकांचा शेती उत्पादनावर प्रभाव पडतो. बऱ्याच वेळा शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. काही वेळा शेतकरी आपल्या उत्पादनाचा खर्च भरून काढू शकत नाही. त्यामुळे शेतीतील उत्पन्नातून आणि उत्पादनात अनिश्चितता येते. अशा वेळेस शेतकरी आर्थिक गरजेची पूर्तता करण्यासाठी कर्ज घेऊन तो कर्ज जाळ्यात अडकतो. या स्थितीतून सुटका करण्यासाठी शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या हेतूने भारतामध्ये 'राष्ट्रीय पिक विमा योजना' महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

➢ **राष्ट्रीय कृषी विमा योजना :-** (National Agricultural Insurance Schemes)

राष्ट्रीय कृषी विमा योजना ही महाराष्ट्र राज्यात २४ पिकासाठी आठ विभागातील ३३ जिल्ह्यात राबविली जाते.

१) कोकण विभाग (४ जिल्हे) :- ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

२) नाशिक विभाग (४ जिल्हे) :- नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगाव

३) पुणे विभाग (३ जिल्हे) :- पुणे, अहमदनगर, सोलापूर

४) कोल्हापूर विभाग (३ जिल्हे) :- कोल्हापूर, सातारा व सांगली

५) औरंगाबाद विभाग (३ जिल्हे) :- औरंगाबाद, जालना व बीड

६) लातूर विभाग (५ जिल्हे) :- लातूर, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली व परभणी

७) अमरावती (५ जिल्हे) :- अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम व यवतमाळ

८) नागपूर विभाग (५ जिल्हे) :- वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर

➢ राष्ट्रीय कृषी विमा योजनेचे उद्देश :-

१) नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास नुकसानीच्या प्रमाणात शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे.

२) पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे.

३) शेती उत्पादनात स्थैर्य आणण्या करिता मदत करणे.

➢ संशोधन विषयाची निवड :-

मराठवाडा विभागामध्ये ८ जिल्हे आहेत. या आठ जिल्ह्यापैकी एक महत्त्वाचा जिल्हा म्हणून लातूरकडे पाहिले जाते. लातूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था कृषी व इतर उद्योगावर आधारित आहे. कृषी व उद्योग या क्षेत्रांच्या मदतीने या जिल्ह्याने खूप प्रगती केली आहे. लातूर हा स्वतंत्र जिल्हा नव्हता. १६ ऑगस्ट १९८२ मध्ये लातूर हा स्वतंत्र जिल्हा निर्माण झाला. शेतकऱ्यांकडे शेतीत सुधारणा करण्यासाठी पुरेसे भांडवल नाही. यासाठी खासगी सावकाराकडे जावे लागते. शेती व्यवसायातील विविध खर्चामुळे शेतकरी कर्जात जातो. तसेच विविध आपत्तीमुळे शेती व्यवसाय करण्यास असमर्थ ठरतो. या कारणास्तव पिक विमा योजना वरदान ठरते.

लातूर जिल्ह्यात विविध स्वरूपाची शेती पिके घेतली जातात. सोयाबीन, तूर, हरभरा,तीळ, जवस, किंवा ऊस असेल. अशा विविध पिकांवर रोग तसेच अति पाऊस यामुळे नुकसान मोठ्या प्रमाणावर होते. या कारणास्तव राष्ट्रीय पीक विमा योजनेचा लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास या विषयावर लक्ष केंद्रित केले आहे.

➢ संशोधन विषयाची उद्दिष्टे:-

१) कृषी विकासात पीक विमा योजनेचे महत्त्व अभ्यासणे.

२) देशातील व महाराष्ट्रातील पिक विमा योजनेचा हंगाम निहाय (खरीप व रब्बी) थोडक्यात अभ्यास करणे.

३) लातूर जिल्ह्यातील तालुकानिहाय या योजनेचा अभ्यास करणे.

४) पीक विमा योजनेतील समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविणे.

➢ संशोधनाची ग्रहीतके :-

१) पिक विमा योजनेचे कृषी क्षेत्रातील महत्त्व वाढत आहे.

२) लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना संजिवनी ठरत आहे.

३) लातूर जिल्ह्यातील पिक विमा योजनेत रब्बी हंगामापेक्षा खरीप हंगामातील संरक्षित शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे.

४) पिक विमा योजनेत शेतकऱ्यांच्या अनेक समस्या आहेत.

५) पिक विमा या योजनेच्या व्याप्तीत वाढ होत आहे.

➢ संशोधनाचा कालावधी :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक साधनाचा वापर करण्यात येणार आहे. निवडलेल्या लाभधारक शेतकऱ्याच प्रश्नावलीच्या मदतीने त्यांच्या शेती व्यवसायात पीक विम्याची मदत किती झाली याचा अभ्यास केला जाणार आहे. तर द्वितीय माहिती २०१०-११ ते २०२०-२१ मधील विविध अहवाल तसेच लेख यांचा आधार घेण्यात येणार आहे.

➢ संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही शेती व्यवसायात पीक विम्याच्या योगदानापुरती आहे. पीक विमा राष्ट्रीय स्तर, महाराष्ट्र स्तर यांचा विचार केला जाईल. परंतु विशेष रुपाने लातूर जिल्ह्यापुरता मर्यादित अभ्यास केला जाईल.

➢ संशोधनाची मर्यादा :

प्रस्तुत संशोधन लातूर जिल्ह्यापुरताच मर्यादित आहे. संशोधनात पीक विम्यामुळे शेतकऱ्याच्या आर्थिक बाबीवर झालेल्या बदलाचा विचार केला जाईल. प्रस्तुत संशोधन फक्त शेतकरी वर्गापुरते मर्यादित आहे.

➢ संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनासाठी शेती विकासात राष्ट्रीय पीक विमा योजनेचे योगदान विशेष संदर्भ लातूर जिल्हा सन २०१०-११ ते २०२०-२१ या विषयाची निवड केली आहे. या संशोधनासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे. तथ्य संकल्पनासाठी खालील साधनाचा वापर केला आहे.

➢ प्राथमिक स्त्रोत :-

या पद्धतीत संशोधकाने निश्चित केलेल्या संशोधन विषयाशी संबंधित क्षेत्रात स्वतः जाऊन तेथील लाभधारक शेतकऱ्यांशी संपर्क साधून प्रश्नावली व अनुसूचीच्या माध्यमातून माहिती जाणून घेण्यात येणार आहे.

➢ दुय्यम स्त्रोतः-

दुय्यम स्त्रोत ज्यामध्ये सामग्री संग्रहन पद्धतीचा अवलंब केला आहे. ज्यात शासकीय कार्यालये, कृषी कार्यालये, कृषी विषयक अहवाल, ग्रंथ, नियतकालिके, जिल्हा सांख्यिकी अहवाल, आर्थिक व सांख्यिकीय समालोचन, भारतीय रिझर्व बँकेचे अहवाल, वेबसाईट इत्यादी प्रकाशित व अप्रकाशित साहित्याचा वापर केला जाईल.

➢ नमुना निवड पद्धती :-

संशोधन एककांची संख्या जास्त असते. त्यावेळी त्या समग्रातील एककांचा छोटासा नमुना गट निवडला जातो. त्या नमुना गटातील समस्येशी संबंधित निष्कर्ष काढले जातात. त्यास नमुना निवड म्हणतात. लातूर जिल्ह्यातील लाभधारकांचा विचार करता स्थरित यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर केला जाणार आहे. जिल्ह्यातील लाभधारक घेत असताना द्वि स्तरीय रचना केली आहे.

१. प्रथम स्तर :

लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्याची निवड साधा यादृच्छिक पद्धतीने (Stratofied Random Sampling Method) केली जाणार आहे. त्यामुळे लातूर तालुका, अहमदपूर, उदगीर, निलंगा, शिरूर अनंतपाळ, औसा, रेणापूर, देवणी, चाकूर, जळकोट या तालुक्यांची निवड केली आहे.

२. द्वितीय स्तर :

लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एका गावाची निवड करण्यात येणार आहे. यासाठी पण साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी तालुक्यातील गावाचे लाभार्थ्यांच्या यादीनुसार सर्वाधिक लाभार्थी संख्या असलेल्या १० गावांची निवड करण्यात येणार आहे. याच गावातील प्रत्येकी ४० लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. हे लाभार्थी निवडताना त्यांची माहिती घेऊन अनुसूचीच्या, प्रश्नावलीच्या आधारे सर्वेक्षण केले जाईल व निवड केली जाईल.

तालुक्यानुसार गावे व लाभार्थीधारक

अ. क्र	तालुका	गावाचे नाव	निवडलेले लाभार्थी
1	लातूर	बाभळगाव	40
2	औसा	उजनी	40
3	अहमदपूर	शिरूर ता.	40
4	चाकूर	चापोली	40
5	जळकोट	पाटोदा	40
6	देवणी	वलांडी	40
7	शिरुर अ.	साकोळ	40
8	रेणापूर	पानगाव	40
9	निलंगा	औराद श.	40
10	उदगीर	हाळी	40

➢ सांखिकीय तंत्रः-

सदरील विषयानुसार विविध घटकांचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, शेकडा प्रमाण, साध्या वाढीचा दर इत्यादी अनेक सांख्यिकीय तंत्राचा वापर करून तक्ते व आलेखाच्या सहाय्याने उद्दिष्ठानुरुप अभिवृत्ती शोधण्यात येणार आहेत.

➢ प्रकरण विभागणी :

प्रकरण पहिले

प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, जागतीक पातळीवर शेतीचे महत्त्व, शेती समोरील आव्हाने, भारतीय शेती व्यवसाय महत्त्व, भारतीय शेती व्यवसायात झालेला बदल, महाराष्ट्रातील शेती व्यवसाय, तसेच भारतीय शेती व्यवसायावर झालेला हवामानाचा बदल या बदलाचा शेती अर्थ व्यवस्थेवर झालेला परिणाम, पीक विमा पध्दतीची कार्य, आवश्यकता, महत्त्व जागतिक स्तरावर पीक विम्याची सुरुवात, भारतातील पीक विमा योजनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, महत्त्व, महाराष्ट्रातील पीक विमा योजनेची स्थिती, योजना राबविताना येणाऱ्या समस्या, तसेच लातूर जिल्ह्यातील पीक विमा योजनेविषयी माहिती अशा अनेक घटकांचा प्रस्तूत प्रकरणामध्ये अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

संशोधन पध्दती व संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रास्ताविक, संशोधनाचा हेतू, संशोधनाची उद्दिष्ट्ये, महत्त्व, गृहितके, संशोधनाची व्याप्ती, मर्यादा, संशोधनाचा कालखंड, संशोधन समस्या, संशोधन पध्दती, नमुना निवड व संदर्भ साहित्यामध्ये विविध संशोधकांनी संशोधन करुन काढलेले निष्कर्ष व शिफारशी यांचा थोडक्यात परामर्श घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

लातूर जिल्ह्याचे आर्थिक व सामाजिक वैशिष्ट्ये

प्रस्तुत प्रकरणामध्ये लातूर जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलीक स्थान, प्राकृतिक रचना, भुमी, हवामान, लोकसंख्या, नद्या, मृदा इ.अनेक घटकांचे अध्ययन करण्यात येणार आहे. त्यासोबतच आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्थिती इ.चा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे

लातूर जिल्ह्यातील पीक विमा योजनेचे आर्थिक विश्लेषण

(प्राथमिक सामुग्रीवर आधारित)

प्रस्तुत प्रकरणामध्ये अध्ययनासाठी निवड करण्यात आलेल्या पीक विमा योजनेच्या 400 लाभधारकांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात येणार आहे तसेच अनुसुचीच्या आणि मुलाखतीच्या आधारे, सांख्यिकीय माहितीच्या आधारे सुक्ष्म अध्ययन करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

लातूर जिल्ह्यातील पीक विमा योजनेचे आर्थिक विश्लेषण

(द्वितीय सामुग्रीवर आधारित)

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन कालावधीतील पीक विमा योजनेमुळे लाभार्थी शेतकऱ्यांवर झालेल्या आर्थिक परिणामांचा अभ्यास, शासनाचे विविध अहवाल, कृषी विभागाचे विविध अहवाल, संकेतस्थळावरील माहिती व कृषी विमा कंपनीच्या आकडेवारीच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तूत प्रकरणामध्ये संपूर्ण संशोधन अहवालाचा निरिक्षणात्मक व चिकित्सक अभ्यास करुन निष्कर्ष काढण्यात येणार आहेत व त्याचबरोबर या निष्कर्षावरुन संशोधकाला अभ्यासाअंती ज्या शिफारशी योग्य वाटतील त्या मांडण्याचा प्रयत्न सदरिल प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

➢ संदर्भग्रंथ सूची :

1) डॉ. कानेटकर मेधा, 'भारतीय अर्थशास्त्र', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2012

2) पुरोहित वसुधा, 'कृषी अर्थशास्त्र', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, 2016

3) सुधीर बोधनकर, 'सामाजिक संशोधन पध्दती', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2011

4) महाराष्ट्राची आर्थिक पाहाणी - अर्थ व सांख्यिकीय संचलनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई 2022

5) प्रा.रायखेलकर, डॉ.दामजी, 'भारतीय अर्थव्यवस्था' विद्या बूक्स पब्लिशर्स, जाने.2013

6) Economic Survey- 2014-15 Ministry of Agricultural Gov. of India

7) Singh Gurudev, 'Crop Insurance in India', Indian Institute of Management 2010

: संशोधक :

सोमवंशी सुवर्णा भगवानराव

: संशोधक मार्गदर्शक :

डॉ.राजेश्री आप्पाराव जाधव

विभाग प्रमुख

महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

ता.अहमदपूर जि.लातूर